**स्थायी निदेश क्र. १३**

**भूकंपापासून होणारी संभाव्य हानी टाळण्यासाठी नगरपरिषदांनी घ्यावयाची दक्षता व करावयाची उपाययोजना**

**नगरपरिषद प्रशासन संचालनालय,**
**गृहनिर्माण भवन (म्हाडा) तळमजला,**
**वांद्रे (पूर्व) मुंबई- ४०० ०५१.**
**क्र. संकीर्ण २००१/प्र.क्र.४१०/२००१/४**
**दिनांक :२३ मे २००१.**

प्रति,
१) मुख्याधिकारी नगरपरिषद (सर्व)
२) अध्यक्ष नगरपरिषद (सर्व)

०१. महाराष्ट्रातील किल्लारी, जिल्हा लातूर येथील भूकंपात झालेली प्रचंड जिवीत व वित्त हानी तसेच त्यानंतर नुकताच गुजरात येथील भूकंपात झालेली प्रचंड जिवीत व वित्त हानीची आपणास कल्पना आहेच.

०२. भूकंप ही निसर्ग निर्मित घटना असून त्याची आगावू पूर्व सूचना मिळण्याची सध्या तरी कोणतीच यंत्रणा अस्तित्वात नाही. त्यामुळे जिवीत व वित्त हानी मोठया प्रमाणात होते. यासाठी खबरदारी घेण्याच्या दृष्टीने सध्या अस्तित्वात असलेली व नव्याने करावयची बांधकामे ही भूकंपात सुरक्षित राहतील या करिता दक्षता घेणे हेच फक्त मानवाच्या हातात असून त्या दृष्टीने उपाय योजना करण्याचा एक भाग म्हणून नगरपरिषदांना खालीलप्रमाणे निर्देशित करण्यात येत आहे.

१) नगरपरिषदांनी आपल्या क्षेत्रातील धोक्याच्या इमारतींची वेळोवेळी पाहणी करुन अशा धोक्याच्या इमारतींना धोका दूर करण्याच्या दृष्टीने आवश्यक ती उपाययोजना करण्यास संबंधित मिळकत धारकास भाग पाडावा, तसे न झाल्यास अशा धोक्याच्या इमारती त्वरीत पाडण्याच्या दृष्टीने कार्यवाही करावी.

२) महाराष्ट्र हा भूकंप प्रवण क्षेत्रात येत असल्याने नवीन बांधकाम परवानगी/ इमारत दुरुस्ती परवानगी देताना अशी नियोजित बांधकामे भूकंपरोधक होतील या दृष्टीने या संदर्भात भारतीय मानक संस्थेने पुढील पुस्तकाद्वारे मानके विशद केलेली आहेत, त्यातील तरतुदींचा अशी परवानगी देताना विचार करणेत यावा.

| मानक क्रमांक | विषय |
|---|---|
| IS -1893/1984 | Criteria for Earthquake resistant Design of Structures (4th revision) Amendment -1) |
| IS - 4326/1993 | Earthquake resistance design and construction of Buildings (2nd revision) Amendment – 1 (code of practice) |
| IS - 13827/1993 | Improving Earthquake resistance of earthen Buildings Amendment -1 (Guide Lines) |
| IS - 13828/1993 | Improving Earthquake resistance Low Strength masonary Buildings (Guide Lines) Amendment - 1 |
| IS – 13920/1993 | Ductile detailing of reinforced concrete Structures subjected to sesmic forces (code of practice) Amendment – 1 |
| IS – 13935/1993 | Repairs & Sesmic Strengthening of Buildings (Guide Lines ) |

(सद्याची या पुस्तकांची एकूण किंमत रु.१२८०/- एवढी आहे )

वरील पुस्तके मिळण्याचे ठिकाण :
भारतीय मानक ब्युरो
नॉव्हेल्टी चेंबर, ३ रा मजला
नॉव्हेल्टी सिनेमाचे वर
ग्रॅन्ट रोड, मुंबई

३) वरील व यानंतर वेळोवेही या विषयावर प्रसारित होणारी पुस्तके नगरपरिषदांनी खरेदी करुन ती संग्रही ठेवावीत व नगरपरिषद स्थापत्य विभाग/ नगररचना विभाग/ मुख्याधिकारी यांनी त्यातील तरतुदींचा काळजीपूर्वक अभ्यास करुन प्रत्येक संबंधित प्रकरणी तंतोतंत वापर करण्याची दक्षता घ्यावी.

०३. नवीन बांधकाम प्रस्ताव / दुरुस्ती प्रस्ताव नगरपरिषदांकडे सादर करताना खाजगी मिळकतधारकांच्या वास्तुविशारद/ स्थापत्य अभियंता यांनी वरील तरतुदींचे पालन करण्याच्या दृष्टीने घ्यावयाची दक्षता व उपाययोजना या संदर्भात भारतीय मानक संस्थेने विहित केलेल्या मानका संदर्भात स्थानिक पातळीवर वाजवी प्रसिध्दी नगरपरिषदांनी द्यावी.

०४. नगरपरिषदेकडे बांधकाम परवानगी / दुरुस्तीसाठी सादर होणा-या सर्व प्रस्तावांची प्रथम छाननी नगरपरिषदेच्या ज्या तांत्रिक अधिकारी / कर्मचारी यांचेकडून करण्यात येते, त्यांनी भारतीय मानक ब्युरोने भूकंपरोधक बांधकामाचे संदर्भात विहित केलेल्या तरतुदीनुसार संबंधित बांधकाम परवानगी/ बांधकाम दुरुस्ती प्रस्ताव बरोबर असल्याची खातरजमा करण्याची जबाबदारी त्यांचेवर राहील वत्यांनी मुख्याधिका-यांकडे बांधाकम परवानगी मंजूरीसाठी शिफारस करताना टिप्पणीत तसा सुस्पष्ट उल्लेख करणे बंधनकारक राहील. वरील तरतुदींचे पालन न करणारे नगरपरिषद तांत्रिक अधिकारी / कर्मचारी हे शिस्तभंग कारवाईस पात्र राहतील.

०५. नगरपरिषद क्षेत्रात नवीन बांधकामास परवानगी देताना किंवा अस्तित्वातील बांधकाम दुरुस्तीस परवानगी देताना संबंधित परवाना धारक असे बांधकाम भूकंपरोधक करण्याच्या दृष्टीने आवश्यक त्या अटी/शर्ती परवाना पत्रात नमूद कराव्यात.

०६. नियोजित बांधकाम भूकंपरोधक करण्याचे दृष्टीने सक्षम स्थापत्य अभियंत्याकडून त्याचे भारतीय मानक संस्थेने प्रमाणित केल्याप्रमाणे नकाशे व आराखडे परवाना धारकाने प्राप्त करुन घेवून त्याची एक प्रत नगरपरिषदेकडे सादर करण्याची तसेच त्या आराखडयानुसार सक्षम स्थापत्य अभियंत्याचे देखरेखीखाली बांधकाम पूर्ण करुन घेण्याची व त्याप्रमाणे बांधकाम हे भारतीय मानक संस्थेने विहित केलेल्या तरतुदीनुसार पूर्ण करुन घेण्यात आल्याबाबत सक्षम अभियंत्यांचा दाखला नगरपरिषदेने प्राप्त करुन घेवून मगच बांधकाम पूर्णत्वाचा दाखला देणेत यावा.

०७. मुख्याधिकारी यांनी बांधकाम परवानगी देताना / बांधकाम वापर परवानगी देताना वरील सूचनांचे पालन न करता बांधकाम परवानगी / बांधकाम वापरपरवानगी दिल्याचे निदर्शनास आल्यास व भूकंपाचे वेळी अशा इमारतीमध्ये राहणा-या नागरीकांची जिवीत किंवा वित्त हानी झाल्यास त्याची जबाबदारी मुख्याधिकारी व त्यांच्या हाताखालील अशी प्रकरणे हाताळणा-या अभियंता/ सहायक यांची राहील म्हणून सर्व मुख्याधिकारी यांनी यांची नोंद घ्यावी.

०८. संभाव्य भूकंपापासून जिवित व वित्त हानी होवू नये म्हणून या दृष्टीने आवश्यक ती खबरदारी घेण्याच्या दृष्टीने नगरपरिषदांनी कृती आराखडा तयार करुन ठेवावा व आपत्कालीन परिस्थितीत त्याचा वापर करावा.

संभाव्य भूकंपापासून जिवीत व वित्त हानी टाळता यावी म्हणून वरील स्थायी निदेशाचे नगरपरिषद स्तरावर काटेकोरपणे पालन केले जावे.

( भगवान सहाय )
संचालक
नगरपरिषद प्रशासन संचालनालनाय.

प्रत माहितीकरिता व आवश्यक कार्यवाहसाठी

१) आयुक्त तथा प्रादेशिक संचालक नगरपरिषद प्रशासन (सर्व)

२) जिल्हाधिकारी (सर्व)

३) संचालक, नगररचना कार्यालय, महाराष्ट्र शासन, मध्यवर्ती इमारत, पुणे ४११ ००१.

४) उप संचालक, नगररचना (सर्व)

५) प्रमुख नियोजनकार, सिडको, वसई विरार, उप प्रदेश, अंबिका कॉम्पलेक्स, नवघर (पूर्व), ता. वसई,जिल्हा ठाणे.